# मुलुंड सहकारविश्व को.ऑप.हौ.सो.लि.

(रजि.नं.बी.ओ.एम./एच.एस.जी/२२१९/६९)
नाहूर व्हिलेज रोड, मुलूंड (प), मुंबई -४०००८०.

---

## संस्थेच्या दिनांक २७/०७/२०२५ रोजी झालेल्या

## विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त (मसुदा)

मुलुंड सहकार विश्व को.ऑप.हौ.सोसायटी लि. या संस्थेची **रविवार दिनांक २७/०७/२०२५ रोजी विशेष सर्व साधारण सभा, महाराष्ट्र सेवा संघ, अपना बाजार, जे.एन.रोड, मुलुंड (प), मुंबई -४०००८०** या ठिकाणी घेण्यात आली त्याचे इतिवृत्त.

सर्व प्रथम दुपारी १.०० वाजता गण संख्येअभावी अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करण्यात येत आहे असे सचिव श्री.आकाशनंद हिरवे यांनी जाहीर केले. त्यानंतर ठीक २.०० वा. संस्थेचे अध्यक्ष श्री.सचिन माने यांनी सर्व उपस्थित सभासदाचे स्वागत करुन सभेला सुरुवात केली सभेच्या सुरुवातीला आपल्या संस्थेतील ज्या सभासदांना देवाज्ञा झाली. अशा सभासदांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण केली. त्यानंतर श्री.माने यांनी प्रस्तावना करत आजच्या विशेष सर्वसाधारण सभेचा उददेश स्पष्ट केला व आज आपल्याला ही विशेष सर्वसाधारण सभा यशस्वी करायची आहे अशी सर्व सभासदांना विनंती केली व सभेचे या पुढील कामकाज सचिव श्री.आकाशनंद हिरवे हे पाहतील असे स्पष्ट केले.

त्यानंतर श्री.हिरवे यांनी सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत करुन विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस वाचून दाखवली आणि त्यानुसार **विषय क्रमांक एक** वाचवून दाखविला. विकासक Secveer Realters LLP यांना सादरीकरण करण्यासाठी पाचरण केले.

Secveer Realters LLP यांनी आपली व त्यांच्या सोबत आलेल्या संचालक, तंत्रज्ञ, कायदेविषयक सल्लागार यांची ओळख करुन दिली व त्यानंतर संस्थेच्या संभवित प्रकल्पाचे सादरीकरण केले. सदर सादरीकरणात त्यांनी सभासदांना देण्यात येणारा वाढीव एरिया, कॉरपस निधी, बँक गॅरन्टी, भाडे, इत्यादी बाबत सविस्तर माहिती दिली. त्यावर श्री.सुनीलराजा नाडार, श्री.वैभव कांबळे, श्री.कसबे, श्री.यतीन कांबळे, यांनी सभासदांची घरे व विक्रीसाठी असलेली घरे यांच्या इमारती एकत्र असाव्यात अशी सुचना केली. त्याबाबत विकासक यांनी इमारतीच्या आराखडयाच्या वेळी सुचनेचा विचार करु असे आश्वासन दिले. तसेच रेरा बाबत विचारलेल्या प्रश्नांनाही विकासक यांनी उत्तरे दिली व सर्व शंकाचे निरसन करण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर विनायक डेव्हलपर यांनी सादरीकरण केले. त्यांचे सादरीकरण झाल्यावर श्री.चारुदत्त कसबे, श्री.वैभव कांबळे, दिपेश देढीया, श्री.रवी कांबळे यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली बहुतेक सदस्यांनी ६१० मोफा कार्पेट एरिया दिला त्यात आपण अजून वाढ करावी अशी विनंती केली पण त्यांनी त्यास नकार दिला, तसेच मेंबर यांची घरे व विक्रीसाठी असलेली घरे यांच्या इमारती वेगवेगळया न करता एकत्र असाव्यात अशी विनंती केली त्यावर श्री.विनायक डेव्हलपर्स यांनी नकार दिला. सरते शेवटी रिफंडेबल डिपॉझिट रु.५०,०००/- इतके देण्याचे मान्य केले.

त्यानंतर श्री.हितेश चव्हाण - प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांनी सादरीकरण करत असताना टेंडर डॉक्युमेंटस पासून ते अंतिम दोन विकास निवडी पर्यंत या सर्व अहवाल पी.पी.टी.च्या माध्यमातून सभासदांसमोर सादर केला यात आपण ७ पैकी ६ आणि शेवटी ६ पैकी २ विकासकांची निवड कशा पध्दतीने केली याबाबतचा खुलासा केला आणि श्री.हिरवे यांनी निवडणूक प्रक्रिया कशी घेण्यात येणार आहे याची माहिती दिली व त्यानंतर निवडणुक प्रक्रियेला सुरुवात केली.

सदर निवडणूक प्रक्रियेसाठी निवडणूक अधिकारी म्हणून श्री. महादेव देठे, श्री.रविंद्र मोहिते, श्री.गणेश आव्हाड, श्री.अशोक वाघमारे यांची निवड करण्यात आली आणि त्यांच्या देखरेखेखाली सदर निवडणूक प्रक्रिया अंत्यत खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली.

सदर निवडणुक प्रक्रियेत उपस्थित २०८ सभासदांपैकी १९३ सभासदांनी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला पैकी १ मत पत्रिका बाद झाली आणि १९२ सभासदांनी प्रत्यक्ष मतदान केले. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व मतांची मोजणी करण्यात आली मतमोजणी झाल्यानंतर Secveer Realter LLP यांना १०२ मते मिळाली तर Vinayk Developer यांना ९० मते मिळाल्याचे निवडणूक अधिकारी श्री.रविंद्र मोहिते यांनी जाहीर करत Secveer Realter LLP यांना क्र. १ ची मते मिळाल्याचे जाहीर केले.

सर्व सभासद बंधू आणि भगिनींनो आपण दि.२७ जुलै २०२५ ची विशेष सर्वसाधारण सभा बहुसंख्येने उपस्थित राहून यशस्वी केल्याबददल आपल्या सर्वांचे मनःपुर्वक धन्यवाद !

त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री.सचिन माने सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

**दिनांक : ०२/०८/२०२५**

**ठिकाण : मुलुंड (प), मुंबई**

**आपले स्नेहांकित**

**(आकाशनंद रा.हिरवे)**
**मानद सचिव**

प्रति,

श्री / श्रीमती ----------------------------------------------------------------------

------------------------ मुलुंड सहकारविश्व को.ऑप.हौसिग सोसायटी लि.,

नाहूर व्हिलेज रोड, मुलुंड (प), मुंबई - ४०००८०